# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
# छत्रपती संभाजीनगर

## सामान्य प्रशासन विभाग
## परिपत्रक/२०२६

या परिपत्रकाद्वारे सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व अभ्यागत यांना कळविण्यात येते की, दैनंदिन रस्ते प्राणांतिक अपघातामध्ये घट करण्याच्या उद्देशाने 'Targets zero Fatality District महाराष्ट्र' उपक्रम राबविण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने दि. ३०-०९-२०२५ रोजीच्या पत्राद्वारे सूचना/ निर्देश दिलेल्या आहेत. ज्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील ११ जिल्ह्यामध्ये अपघातांचे प्रमाण जास्त असून, त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश आहे. सदरच्या दैनंदिन रस्ते प्राणांतिक अपघातामध्ये १०% घट कमी करण्याच्या संदर्भाने वरील पत्राद्वारे विशेष सूचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे प्रतिसप्ताह दैनंदिन अपघाताबाबतचा आढावा घेत आहेत.

मोटार वाहन अधिनियम- १९८८ च्या कलम-१२९ मधील तरतुदी, मा. सर्वोच्च न्यायालयाचे Dr. S. Rajaseekaran V/s Union of India प्रकरणात निर्देश दिलेले आहेत.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचा Free Legal Aid Cell (NGO) V/s Government of Maharashtra (AIR 2005 Bom 271) मधील निर्णय विचारात घेता, छत्रपती संभाजीनगर शहर क्षेत्रात हेल्मेट सक्तीची प्रभावी अंमलबजावणी करणे कायदेशीरदृष्ट्या योग्य व आवश्यक आहे.

करिता, विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व अभ्यागत यांना कळविण्यात येते की, दि. १०-०८-२०२६ पासून **विद्यापीठ परिसरात दुचाकी वाहन वापरताना दुचाकीचालक व दुचाकीवर मागे बसलेल्या व्यक्तींना हेल्मेट सक्ती** करण्यात आली आहे. त्याशिवाय विद्यापीठ परिसरात प्रवेश देण्यात येणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४ )(
संदर्भ :- सा.प्र./२०२६/102 )(
दिनांक :- २८-०७-२०२६ )(

**कुलसचिव**

या परिपत्रकाची प्रत:-

१) सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) सर्व शिक्षक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
४) सर्व शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
५) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
६) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.
७) सर्व विद्यार्थी व अभ्यागत